महाराष्ट्र टाइम्स

# घुले विद्यालयात उन्हाळी शिबिर

पुणे : क्विकहिल फाउंडेशन व पंख संस्था, पुणे यांच्यातर्फे 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या के. के. घुले विद्यालयात (मांजरी) येथे एक दिवसीय उन्हाळी शिबिराचे नुकतेच आयोजन केले होते. या शिबिरांतर्गत मानसशास्त्रज्ञ आनंद गोडसे यांनी आफ्रिकन वाद्य जेम्बे हे वेगवेगळ्या तालात कसे वाजविले जाते, हे शिकविले. तसेच, जेम्बे वाद्याच्या माध्यमातून त्यांनी ताणतणाव व्यवस्थापन, गटकार्य व रागावरील नियंत्रण या गोष्टी देखील शिकविल्या. योगेश डोंगरे यांनी मुलांना संस्कार भारतीची रांगोळी अत्यंत सोप्या पद्धतीने शिकविली. यानंतर स्मिता आपटे यांनी ओळख करून दिली. अजय शिर्के यांनी मुलांना मार्गदर्शन केले. या वेळी मुख्याध्यापक गोसावी उपस्थित होते. सचिन भापकर यांनी प्रास्ताविक केले.




के. के. घुले विद्यालयात 'शाळांगण' प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना जेम्बे वाद्याची माहिती देण्यात आली.